प्रोप्रा.गायसमुद्रे 9527407701 8459953702
SM
एस.एम गारमेंट
शर्ट-पॅन्टचा कारखाना
पॅन्ट-शर्ट | अरमानी | शेरवानी | सफारी
आमच्याकडे सर्व प्रकारचे ड्रेस एक तासात शिवून मिळतील
बीड रोड, न्यायालया समोर केज जि.बीड
प्रोप्रा.गायसमुद्रे मो.न.9527407701 8459953702
एक वेळ अवश्य भेट द्या

दैनिक
महाराष्ट्राच्या परिवर्तनवादी विचारांचे ऐकमेव निर्भिड दैनिक

# वादळ वार्ता

vadalvartanews@gmail.com
●मुख्य संपादक : अजय भांगे ●कार्यकारी संपादक : रमेश गुळभिले https://epaper.vadalvarta.com मो.न. ९४२२६६००७७

● बीड/महाराष्ट्र ● रविवार ११ ऑगस्ट २०२४ ● आरएनआय-एमएएचएमएआर/२०२३/८७५५५ ● वर्ष १ ले ● अंक ३६० ● पाने ४ ● किंमत ४ रुपये

गाव तेथे वार्ताहर
महाराष्ट्रातील प्रत्येक जिल्हा, तालुका, शहर आणि ग्रामीण भागात
वार्ताहर/पत्रकार आणि जाहिरातदार नेमणे आहेत.
वादळ वार्ता या लोकप्रिय दैनिक वृत्तपत्राकरिता महाराष्ट्रातील प्रत्येक जिल्हा, तालुका, शहर आणि ग्रामीण भागात प्रतिनिधी नेमणे आहेत. इच्छुकांनी त्वरित संपर्क साधावा.
जॉईन झालेल्या प्रत्येक प्रतिनिधींना आय कार्ड आणि नियुक्ती पत्र दिले जाईल.
* पात्रता * समाजसेवेची आवड, जनसंपर्क, फोन असणे आवश्यक, सोशल मीडियाचा वापर करता येणे
दैनिक वादळ वार्ता महाराष्ट्राच्या परिवर्तनवादी विचारांचे एकमेव विभागीय निर्भिड दैनिक मो.न.9422660077

# युक्रेनचा रशियावर भयानक हल्ला !

# २७ ड्रोन पाडले ,३० किमी आत घुसले सैनिक

## पुतीन यांची आणीबाणीची घोषणा

रशिया-युक्रेन युद्ध सुरू होऊन तब्बल दोन वर्ष होत आले आहे. हे युद्ध गंभीर टप्प्यावर पोहोचले आहे. यूक्रेनने रशियावर आता पर्यंतचा सर्वात भीषण प्रतीहल्ला केला आहे. सुमारे १००० युक्रेनियन सैनिकानी आंतरराष्ट्रीय सीमा ओलांडून थेट रशियाच्या कुर्क प्रदेशात प्रवेश केले आहे. युक्रेनच्या लष्कराने रशियाने डागलेले सर्व २७ लढाऊ ड्रोन देखील पाडले आहेत. युक्रेनच्या हवाई दलाने शुक्रवारी ही माहिती दिली. दरम्यान, युक्रेनच्या या हल्ल्यामुळे रशियाने कुर्क भागात आणीबाणी जाहीर केली आहे. युक्रेन-रशिया युद्ध सुरू झाल्यापासून यूक्रेनचा हा रशियन भूमीवरील सर्वात मोठा हल्ला मानला जात आहे. शेकडो युक्रेनियन सैनिकांनी चार दिवसांपूर्वी सीमापार हल्ला केला आहे. रशियन अधिकाऱ्यांनी सांगितले की, रशियन विमानाने डागलेल्या क्षेपणास्त्राने आदल्या



दिवशी युक्रेनियन शॉपिंग मॉलला जमीनदोस्त झाले आहे. या हल्ल्यात किमान ११ नागरिक ठार झाले आहेत. तर ४४ जण जखमी झाले आहेत. हे क्षेपणास्त्र युक्रेनच्या पूर्वेकडील डोनेस्तक भागातील कोस्तियानतिनिव्हका येथील निवासी



भागात असलेल्या मॉलवर पडले. गेल्या वर्षी सप्टेंबरमध्येही रशियन क्षेपणास्त्राने तेथील एका बाहेरच्या बाजारपेठेला लक्ष्य केले होते, त्यात १७ जण ठार झाले होते. दुसरीकडे, रशियाच्या संरक्षण मंत्रालयाने म्हटले आहे की, युक्रेनच्या या हल्ल्यांना प्रत्युत्तर देण्यासाठी अतिरिक्त सैन्य कुर्क प्रदेशात पाठवले जात आहे. आरआयए-नोवोस्ती या वृत्तसंस्थेने संरक्षण मंत्रालयाच्या हवाल्याने म्हटले आहे की, रशिया कुर्क प्रदेशात अनेक रॉकेट लाँचर्स, तोफांच्या तोफा, ट्रेलर्सवर पाठवल्या जात आहे. या ठिकाणी मोठ्या प्रमाणात लष्कर तैनात केले जात आहे. "कुर्स्क प्रदेशातील परिस्थिती कठीण आहे," कुर्कचे कार्यवाहक गव्हर्नर अलेक्सी स्मरनोव्ह यांनी टेलिग्रामवर सांगितले. रशियन संरक्षण मंत्रालयाने सीमेपासून सुमारे १० किलोमीटर अंतरावर असलेल्या सुड्झाच्या पश्चिम सीमेवर भीषण लढाईची होत असल्याचं सांगितल आहे. या शहरात रशियाची एक महत्त्वाची नैसर्गिक वायू वाहून नेणाऱ्या पाइपलाइन केंद्र आहे. दुसरीकडे, युक्रेनच्या अधिकाऱ्यांनी, मॉस्कोच्या नैऋत्येस सुमारे ५०० किलोमीटर (३२० मैल) अंतरावर केलेल्या या हल्ल्याबाबत बोलण्यास नकार दिला आहे, परंतु युक्रेनचे राष्ट्राध्यक्ष वोलोडिमिर झेलेन्स्की यांच्या एका सल्लागाराने सांगितले की, सीमावर्ती भागावरील हल्ल्यामुळे रशियाला धोका निर्माण झाला आहे. हे लक्षात घ्या की युद्ध आता हळूहळू रशियन भूमीत सरकत आहे.

### रशियात 500 पेक्षा जास्त नागरिकांचा मृत्यू

**आम्ही तुम्हाला सांगतो की रशिया फेडरल स्तरावर आणीबाणीची घोषित करतो जेव्हा ५०० पेक्षा जास्त नागरिक ठार झालेले असतात किंवा ५०० दशलक्ष रूबल (सुमारे ६ दशलक्ष डॉलर्स) पेक्षा जास्त नुकसान होते. कुर्स्कमधील लढतीने रशियन माध्यमांचे तसेच जगभरातील माध्यमांचे लक्ष वेधून घेतले आहे. कुर्कच्या लढाईच्या बातम्या रशियन माध्यमांमध्येही दाखवल्या जात आहेत.**



## केतुरा येथील शेतकऱ्याची मुलगी झाली पोलीस सुजाता तळेकर हिने घरी बसून केला अभ्यास .आई-वडिलांचे केले स्वप्न साकार, परमेश्वर नाना तळेकर

**बीड प्रतिनिधी**

बीड तालुक्यातील केतुरा येथील लोकनियुक्त सरपंच परमेश्वर नाना तळेकर यांची पुतणी ,सुजाता बंडू तळेकर या विद्यार्थिनीच प्राथमिक शिक्षण श्री नगद नारायण विद्यालय नारायणगड या ठिकाणी झालं, व बारावीपर्यंत शिक्षण गजानन माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय नवगण राजुरी या ठिकाणी झालं, शिक्षण झाल्यानंतर सुजाताने ठरवलं की मला पोलीस व्हायचं, घरची परिस्थिती अत्यंत गरिबीची असल्यामुळे, आई वडील शेतामध्ये काम करतात, मग मुलीने ठरवले की आपण घरीच अभ्यास करायचा, पुढचं स्वप्न जिद्द मेहनत संघर्ष या मुलीने, आपल्या आई-वडिलांसमोर ठेवून एक नवी उमेद संघर्ष या हेतूने तिने अभ्यास केला ,मुलीने पोलीस भरतीच्या माध्यमातून अखेर मुलगी पोलीस भरतीमध्ये या यशाच्या शिखरावर आई-वडिलांचे स्वप्न या मुलीने साकर केले, केतुरा येथील सरपंच उपसरपंच संघटना महाराष्ट्र राज्य मुंबई जिल्हाप्रमुख बीड. तथा केतुरा गावचे विद्यमान सरपंच परमेश्वर नाना तळेकर यांनी या मुलीचा सत्कार केला, व पुढील भावी आयुष्यासाठी शुभेच्छा दिल्या, यावेळी उपस्थित, अशोक गव्हाणे, रामेश्वर चाळक, संदीप कोकट, विशाल लोणकर, अशोक फड, रामनाथ गव्हाणे, बाळासाहेब सांगूळे गणेश तळेकर, निलेश ससाने, अक्षय गवते, बाळू गायकवाड, गोविंद तळेकर, नारायण तळेकर,

# लाडक्या बहिणीला न्याय देणार! - नितीन साखरे

**बीड / प्रतिनिधी**

राज्याचे मुख्यमंत्री एकनाथराव शिंदे यांनी महिलांच्या सन्मानासाठी लाडकी बहीण योजना काढली असून या योजनेचा लाभ प्रत्येक महिलेला मिळावा यासाठी सामाजिक कार्यकर्ते नितीन साखरे यांनी बीड शहरातील महिलांसाठी शिबिर आयोजित करून वार्ड क्रमांक दोन मधील महिलांना योजनेचा लाभ मिळावा यासाठी पुढाकार घेतला आहे. लाडकी बहीण योजनेच्या विविध कागदपत्रांसाठी महिलांना शासकीय कार्यालयांमध्ये जाऊन कागदपत्र उपलब्ध करण्यासाठी मोठे प्रयत्न करावे लागत होते. यासाठी सामाजिक कार्यकर्ते नितीन साखरे यांनी वार्ड क्रमांक दोन मध्ये शिबिर आयोजित करून जवळपास एक ते दीड हजार महिलांचे लाडकी बहीण योजनेसाठी कागदपत्र उपलब्ध करून देत या महिलांना योजनेचा लाभ उपलब्ध करून दिला आहे. लाडकी बहीण योजनेच्या माध्यमातून



महाराष्ट्र शासनाने महिलांमध्ये उत्साह निर्माण केला असून महिलांमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे. सामाजिक कार्यकर्ते नितीन साखरे यांनी व त्यांच्या मित्र मंडळाच्या वतीने महिलांना या योजनेचा लाभ उपलब्ध करून दिल्याबद्दल वार्ड क्रमांक दोन मधील महिलांनी नितीन साखरे यांचे आभार व्यक्त केले आहेत. सदरील शिबिर सुरू असताना राष्ट्रवादी काँग्रेसच्या डॉ. सारिकाताई क्षीरसागर यांनी सदरील शिबिरास भेट देऊन नितीन साखरे यांच्या पुढाकाराचे कौतुक करत महिलांना प्रोत्साहित केले. यामुळे बीड शहरातील वार्ड क्रमांक दोन मध्ये नितीन साखरे यांच्या बद्दल महिलांमध्ये मोठ्या प्रमाणात प्रसिद्धी मिळाली असून सामाजिक कार्यकर्ते नितीन साखरे यांचे महिलांनी आभार व्यक्त केले आहेत.

## किनवट डाक विभागातून भारतीय सैन्य दलातील जवानांना पाठवल्या राख्या

**नांदेड प्रतिनिधी :** किनवट : "एक धागा शौर्यासाठी" या भारतीय डाक विभाग नांदेड व उपविभाग किनवट यांच्या मार्फत भारत देशातील सर्व सैन्यदल, पोलीस दल आणि निमलष्करी दलाच्या जवानांना राखी बांधून सैनिकांप्रती कृतज्ञता व्यक्त करण्या करिता दि.१०-ऑगस्ट रोजी किनवट उपविभाग अंतर्गत विविध शाळांमार्फत अनेक विद्यार्थिनींनी आपल्या सैनिकांना पत्राद्वारे राखी पाठवली.किनवट येथे स्थित कन्याका परमेश्वरी प्राथमिक शाळा येथील सानिध्या मारुती रेंगे व आरोही नितीन निलगिरीवार या विद्यार्थ्यांनी स्वतः राखी बनवून देशातील सैनिकांना राख्या पाठवल्या.सदर कार्यक्रमाच्या वेळी संस्थेचे सचिव अमोल कंचरलावार संस्थेच्या उपाध्यक्ष श्रीमती रश्मी कंचरलावार मुख्याध्यापक नितीन निलगिरीवार, सहशिक्षक कुसनेनिवार, कंचरलावार किनवट डाक उपविभागाचे डाक निरीक्षक,माधव बारस्कर पोस्ट मास्तर भोसीकर,संजय मेश्राम वैभव मोरे,शिवाजी पंदे,पोस्टमन यांच्यासह डाक विभागाचे कर्मचारी उपस्थित होते.




# नोकरीच्या संधी प्राप्त करून देण्यासाठी महाविद्यालय सदैव तत्पर -प्राचार्य सुहास मोराळे

**माजलगाव । प्रतिनिधी**

येथील भारतीय शिक्षण प्रसारक संस्था संचलित श्री सिद्धेश्वर महाविद्यालय माजलगाव येथे दिनांक 8 ऑगस्ट 2024 रोजी डील्स ऑफ आर्या यांच्यावतीने रोजगार मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सुहास मोराळे हे होते. याप्रसंगी आर्या डील्सचे प्रमुख श्री. जय कोळसे, वर्षा कोळसे, कविता दायमा , सिद्धेश्वर फपाळ, श्रीशैल्य स्वामी, अभिजित ताकट, उपस्थित होते.

प्लेसमेंट विभाग व करिअर कट्टा विभागाचे प्रमुख प्रा.ए. के. होके, डॉ. जी.पी. फसले, डॉ. एन. बी. शिंदे यांनी या कार्यक्रमाचे आयोजन केले होते.

याप्रसंगी या मुलाखतीसाठी 50 पेक्षा अधिक मुलांनी आपली नोंदणी केलेली होती. याप्रसंगी महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ.वाय.आर. मुळये, डॉ. जी.बी. होन्ना, डॉ. .एस.बी. इंगोले, डॉ.जे.




एस. [illegible], डॉ. डी.पी. खोडेवाड, डॉ. के.के. लड्डा, प्रा. सुरेश गांडगे तसेच माजलगाव परिसरातील आजी व माजी विद्यार्थी या मेळाव्यासाठी उपस्थित होते. याप्रसंगी मार्गदर्शन करताना महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सुहास मोराळे म्हणाले की, महाविद्यालय विद्यार्थ्यांना रोजगार संधी उपलब्ध करून देण्यासाठी सदैव वेगवेगळ्या प्रकारच्या रोजगार मेळाव्याचे आयोजन करत आहे. या संधीचा फायदा महाविद्यालयाच्या विद्यार्थी व माजी विद्यार्थ्यांनी घ्यावा असे अवाहन त्यांनी याप्रसंगी केले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. अशोक होके यांनी केले तर आभार डॉ. गोरक्षनाथ फसले यांनी मानले.

# मुक्ताईनगरात पत्रकारांच्या सर्तकतेने लाखो रुपयांचा गुटखा पोलिसांना केला स्वाधीन

**जळगाव प्रतिनिधि**

महाराष्ट्रात प्रतिबंधित असलेला विमल गुटखा मध्यप्रदेशातील बुरहाणपुर वरुन मुक्ताईनगर मार्गे जळगाव येथे जात असलेला लाखो रुपयांचा गुटखा,मुक्ताईनगर युवक कॉंग्रेसचे विधानक्षेत्र अध्यक्ष राजुभाऊ जाधव,पत्रकार नितिन सुरवाडे जि.एस.नाइन न्युज जळगाव जिल्हा प्रतिनिधी,अर्जुन आसणे नवराष्ट्र तालुका प्रतिनिधी मुक्ताईनगर बोदवड,जयराज पवार महा इंडिया न्युज संपादक,चेतन तायडे महा इंडिया न्यूज उपसंपादक यांनी मुक्ताईनगर पोलिसांच्या ताब्यात दिली. सविस्तर वृत असे की दि.९ रोजी सकाळी १२ वाजेच्या सुमारास सदर पत्रकार हे मुक्ताईनगर मार्गे रावेर खासगी कामासाठी जात असतांना बोलोरो पिक क्रमांक. एमएच.१५. एचएच.१०८८ गाडी क्रमांकाची गाडी भरधाव वेगाने मुक्ताईनगर कडे पुरनाड फाट्यावरून जात असतांना गाडी चालकाच्या हालचाली वरून सदर गाडीमध्ये महाराष्ट्रात प्रतिबंधित असलेला विमल गुटखा असल्याची शंका आल्याने पुरनाड



फाट्याजवळ गाडी थांबवली असता सदर गाडी चालक याची विचारपूस केली असता एवढ्या भरधाव वेगाने गाडी का चालवत आहे असे विचारले असता गाडी मध्ये अवैध गुटखा असल्याची कबुली गाडी चालकाने दिली तसेच तात्काळ दुरध्वनीद्वारे मुक्ताईनगरचे उपविभागीय पोलिस अधिकारी श्री. राजकुमार शिंदे साहेब यांना संपर्क करून संबंधित गाडीमध्ये महाराष्ट्रात प्रतिबंधित असलेला विमल गुटखा असल्याची कबुली गाडी चालकाने दिली आहे तरी आपण आपल्या पोलिस कर्मचारी यांना घटनास्थळी पाठवावे व गाडी ताब्यात घ्यावी असे सांगण्यात आले त्या अनुषंगाने काही मिनिटांतच दोन पोलिस कर्मचारी घटनास्थळी दाखल झाले व सदर गाडी मुक्ताईनगर पोलिस स्टेशन मध्ये आणण्यात आली व चालक चेतन बारी रा.जळगांव यांना पत्रकारांनसमोर विचारपूस केली असता मुळ मालक जळगाव चे असल्याचे सांगितले सदर गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया पोलिस स्टेशन मध्ये चालु आहे.

# पैठणला रानभाज्या महोत्सव: महोत्सवात ३०प्रकारच्या भाज्या

**पैठण।प्रतिनिधी**

लोकांमध्ये रानभाज्या बाबत ओळख,आरोग्य विषयक महत्त्व व जागृती करण्यासाठी आज पैठण पंचायत समिती कार्यालयात कृषी विभागाच्या वतीने रानभाज्या महोत्सव कृषी तंत्रज्ञान व्यवस्थापन यंत्रणा ‘आत्मा ‘तर्फे आयोजित केला होता. यामध्ये तीस प्रकारच्या रानभाज्यांचा समावेश होता.नागरिकांमध्ये रानभाज्या सेवनाचे प्रमाण वाढले आहे. नागरिक मोठ्या आवडीने रानभाज्या खरेदी करतात.नियमित भाज्यांपेक्षा अधिक दर असताना



देखील रानभाज्यांना पसंती दिली जाते. या कारणामुळे मागील तीन वर्षापासून या महोत्सवाचे आयोजन करण्यात येत असल्याची माहिती तालुका कृषी अधिकारी संदीप शिरसाठ यांनी दिली. महोत्सवाचे उद्घाटन विलास बापू भुमरे यांच्या हस्ते करण्यात आले.यावेळी पंचायत समिती गट विकास अधिकारी मनोरमा गायकवाड, माजी नगराध्यक्ष सुरज लोळगे, सरपंच किशोर चौधरी, अरुण काळे, उमेश टट्टू संचालक साई कृषी पैठण, अमोल परसुडे सहाय्यक तंत्रज्ञान व्यवस्थापक, प्रदीप शिंदे मंडळ कृषी अधिकारी, राजेंद्र सरोदे, सुहास धस ,निंगल भोसले ,कृषी पर्यवेक्षक जगदीश सोलाट, मंगेश निकम, अशोक पठाडे, गणेश वाणी ,तसेच सर्व कृषी सहाय्यक व आत्मा टीम सहाय्यक तंत्रज्ञान व्यवस्थापक तसेच कृषी सहाय्यक, कृषी पर्यवेक्षक यांची उपस्थिती होती

# सेवा निवृत्ती निमित्त मुख्याध्यापक विजयकुमार खुळे याचा सत्कार



जालना ।प्रतिनिधी जालना तालुक्यातील विरेगाव येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेतील मुख्याध्यापक विजयकुमार खुळे हे नियत वयोमानानुसार ३१ जुलै रोजी सेवानिवृत्त झाले. त्यांनी ३९ वर्ष सेवा केली. सेवानिवृत्तीबद्दल शाळेतील सर्व शिक्षकांनी त्यांचा सपत्नीक शाल, श्रीफळ, कपडे देऊन सत्कार करण्यात आला. यावेळी शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष विलास मस्के, गणेश शिंदे, केंद्रप्रमुख अरुण जाधव, श्रीकांत बागल, गणेश काळे, मयुरा वाकडीकर, विनया गायकवाड, कांचन खरात यांच्यासह चितळी पुतळी केंद्रातील व विरेगाव शाळेतील सर्व शिक्षक, पालक, विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सहशिक्षक जाधव यांनी केले. सहशिक्षक घारे यांनी आभार मानले.

# कीर्तनकार श्रीकृष्ण महाराज उबाळे सेट परीक्षा उत्तीर्ण

**बीड (प्रतिनिधी)**

बीड तालुक्यातील आदर्श असणाऱ्या चऱ्हाटा गावचे सुपुत्र, जालना जिल्हा परिषदेमध्ये जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळा पाथरवाला बुद्रुक या शाळेत प्राथमिक पदवीधर या पदावर कार्यरत शिक्षक तथा वारकरी संप्रदायाचे युवा कीर्तनकार ह.भ.प. श्रीकृष्ण महाराज उबाळे हे सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठामार्फत सहाय्यक प्राध्यापक पदाकरिता आयोजित राज्य पात्रता परीक्षा ‘सेट’ ही परीक्षा उत्तीर्ण झाले आहेत. त्यांनी एम.ए. (मराठी साहित्य) या विषयामध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर येथून शिक्षण पूर्ण केले. त्यांनी साहित्य क्षेत्रामध्ये विपुल लेखन करून नऊ पुस्तकांचे लेखन केलेले आहे. संत साहित्यामध्ये त्यांनी जगद्गुरु संत तुकाराम महाराजांच्या अभंग गाथेवर आधारित ‘अभ्यासाशी सांग कार्यसिद्धी’, ‘संत तुकारामांचे दोहे’, ‘मायबापे केवळ काशी’ असे तीन ग्रंथ लिहिलेले आहेत. ‘बालतरंग’, ‘माय मराठी’, ‘अक्षरधारा’ हे बालसाहित्य प्रसिद्ध आहे. याचबरोबर ‘गोफनी गुंडा’ कथासंग्रह, ‘कलमपिसाई’ हा वात्रटिका संग्रह, ‘धोकेबाज’ हा कवितासंग्रह इ. पुस्तकांचे लेखनही त्यांनी केले आहे. ‘सेट’ परीक्षा पात्र झाल्याबद्दल त्यांचे वारकरी संप्रदाय, शिक्षण क्षेत्र, मित्रपरिवार यांच्यासह विविध स्तरातून अभिनंदन होत आहे.



# केजच्या लोकप्रतिनिधींची न झालेल्या कामासाठी श्रेयस्पर्धा

## मांजरा नदी पूल रस्ता दुरुस्तीसाठी केविसंसफचे १४ ऑगस्ट रोजी भव्य रस्ता रोको आंदोलन

**केज।सचिन भालेराव**

अक्षरश मृत्यूचा सापळा बनलेल्या मांजरा नदीपुलाच्या दोन्ही बाजूनी एक किमी रस्ता दुरुस्ती व डांबरीकरणासाठी आता आरपार चे आंदोलन करण्याचा निर्णय केज विकास संघर्ष समितीने घेतला असून या मागणीसाठी आता येत्या बुधवार दि १४ ऑगस्ट रोजी या भागातील सर्व वाहनचालक व जनतेच्या सहभागाने भव्य रस्ता रोको आंदोलन करण्यात येणार असल्याचे समितीचे समन्वयक हनुमंत भोसले यांनी सांगितले आहे. खामगाव-पंढरपूर महामार्गावर केज तालुका अंतर्गत मांजरा नदी पुलाजवळ नवीन पुलाचे काम सुरू असुन सध्याची वाहतूक जुन्या पुलावरून सुरू आहे. मात्र या पुलाच्या दोन्ही बाजूनी मिळून अंदाजे एक किमीचा रस्ता अक्षरशः प्रवाशांच्या मृत्यूचा सापळा बनला आहे. या रस्त्यावर दोन ते तीन फूट खोलीचे खड्डे मोठ्या प्रमाणात पडले असून रस्त्यावर दगड-गोटे व मातीचे प्रमाण ही खूप मोठे आहे. या रस्त्यावर आजपर्यंत शेकडो अपघात





झाले असून काहींना जीव गमवावा लागला आहे तर अनेकांना अपंगत्व आले आहे. रात्रीच्या वेळी या रस्तावर चोऱ्या व लूटीचे प्रमाण खूप वाढल्याने अत्यंत धोकेदायक बनला आहे. विशेष म्हणजे या बाबीची संबंधित यंत्रणा व प्रशासनाला चांगलीच ठाऊक आहे. केज विकास समिती गेली चार वर्षांपासून या रस्त्याच्या दुरुस्ती व डांबरीकरणासाठी उपोषणे, धरणे, घंटानाद व रस्ता रोकोसारख्या आंदोलनाच्या माध्यमातून पाठपुरावा करत आहे. मात्र तरीही या गंभीर प्रश्नासवर महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ दुर्लक्ष का करत आहे हा मोठा प्रश्न आहे. विशेष म्हणजे समितीने वेळोवेळी केलेला पाठपुरावा व आंदोलनामुळे कांही हालचाल झाली की केज तालुक्याचे लोकप्रतिनिधी या कामाच्या श्रेयासाठी घोड्यावर बसतात व न झालेल्या कामाच्या आपल्या नांवे प्रसिद्धी माध्यमातून जाहिराती करतात.

राज्यभर रस्त्याचे जाळे विणणारा महाराष्ट राज्य रस्ते विकास महामंडळ विभाग लोकांचे जीव जाताना एवढा निष्क्रिय व मूग गिळून गप्प का आहे हाही मोठा प्रश्न आहे. या पूर्वी “एमएसआरडिसी ने रस्ता लवकर दुरुस्ती व डांबरीकरण करून देण्याचे तोंडी व लेखी आश्वासने दिली आहेत मात्र काम केले नाही. आता यावेळी या मागणीसाठी केज विकास संघर्ष समिती येत्या बुधवार दि 14 ऑगस्ट रोजी या रस्त्यावरून प्रवास करणारे वाहनचालक व या भागातील नागरिकांच्या सहभागाने मांजरा नदी पुलावर बेमुदत रास्ता रोको आंदोलन करण्याचा निर्णय घेतला आहे. या आंदोलनात या परिसरातील गावकऱ्यांनी, वाहनचालकांनी सहभागी व्हावे असे आवाहनही समिती च्या वतीने करण्यात आले आहे. निवेदनावर हनुमंत भोसले यांच्यासह नासेर मुंडे, शेषराव घोरपडे, संपत वाघमारे यांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

# सुरेश कुटेंच्या डेअरीची ४४०० कोटींची मालमत्ता जप्त होणार

(बीड-विवेक कुचेकर)बीड जिल्ह्यातील ज्ञानराधा मल्टीस्टेटच्या माध्यमातून ठेवीदारांना करोडो रुपयाचा गंडा घातलेल्या सुरेश कुटे व इतर आरोपी विरोधात आर्थिक गुन्हे अन्वेषण विभागाने फास आवळायला सुरुवात केलेली आहे. कुटे पती पत्नी यांचे नावे असणारी २३८ मालमत्तेची माहिती आहे. ४४०० कोटी ,२४लाख ,२०हजार रुपयांची स्थावर मालमत्ता जप्त करण्याची कार्यवाही सुरू आहे. कुटेची मालमत्तेची माहिती मिळणेसाठी भारतातील सर्व राज्यातील नोंदणी महानिरीक्षक यांना पत्रव्यवहार सुरु आहे. कुटे यांच्या विरोधात एमपीआयडीचा प्रस्ताव तयार करण्याचे काम प्रगतीपथावर आहे,अशी माहिती आर्थिक गुन्हे शाखेच्या वतीने देण्यात आली आहे. लवकरच सदर गुन्ह्यातील इतर आरोपींचा शोध घेवून त्यांना अटक करण्याची कार्यवाही चालू आहे. तसेच गुन्हयातील आरोपींची देशभरातील स्थावर व जंगम मालमत्तेचा शोध घेतला जात असून




आहेत व त्या सील करण्यात येत आहेत. ज्ञानराधा मल्टिस्टेट को. ऑप क्रेडीट सो.लि.बीड चे बीड जिल्हयात २२ शाखा असून सदर मल्टीस्टेट विरुद्ध जिल्हयातील विविध पोलीस स्टेशनला आजपावेतो ४१ गुन्हे दाखल झाले आहेत. त्यामधील एकूण रक्कम ४२,३३,३७,००३/- रूपयाचा अपहार झालेबाबत तक्रारीमध्ये नमूद आहे. यामध्ये दररोज मोठया प्रमाणात वाढ होत. तसेच ज्ञानराधा मल्टीस्टेटचे आजपावेतो १.३८८ ठेवीदार यांनी आर्थिक गुन्हे शाखा, बीड येथे त्यांच्या एकूण ९५,८८,३९,४१९/ रूपये रकमेची विश्वासघात व फसवणूक झालेल्या तक्रारी व त्याबाबतचे पुरावे या शाखेत दिलेले आहेत. त्यावरून गुन्ह्याचे तक्रार मधील व एकूण-१३८,४१,७६,४२२/- रूपये रकमेची फसवणुक झाले बावत माहिती आजपर्यंत प्राप्त झालेली आहे. व त्यामध्ये दिवसेंदिवस मोठ्या प्रमाणात वाढ होत आहे.

ज्ञानराधा मल्टिस्टेट को. ऑप क्रेडीट सो.लि.बीड चे बीड जिल्हयात २२ शाखा असून सदर मल्टीस्टेट विरुद्ध जिल्हयातील विविध पोलीस स्टेशनला आजपावेतो ४१ गुन्हे दाखल झाले असून त्यामधील एकूण रक्कम ४२,३३,३७,००३/- रूपयाचा अपहार झालेबाबत तक्रारीमध्ये नमूद आहे. यामध्ये दररोज मोठया प्रमाणात वाढ होत. तसेच ज्ञानराधा मल्टीस्टेटचे आजपावेतो १.३८८ ठेवीदार यांनी आर्थिक गुन्हे शाखा, बीड येथे त्यांच्या एकूण ९५,८८,३९,४१९/ रूपये रकमेची विश्वासघात व फसवणुक झालेल्या तक्रारी व त्याबाबतचे पुरावे या शाखेत दिलेले आहेत. त्यावरून गुन्हयाचे तक्रार मधील व एकुण-१३८,४१,७६,४२२/- रूपये रकमेची फसवणुक झाले बावत माहिती आजपर्यंत प्राप्त झालेली आहे. व त्यामध्ये दिवसेंदिवस मोठ्या प्रमाणात वाढ होत आहे.

# मराठी सिनेसृष्टीने गमावला हिरा! जेष्ठ अभिनेते विजय कदम यांचे निधन

**मुंबई।प्रतिनिधी**

मराठी सिनेसृष्टीतून एक अत्यंत दुःखद आणि धक्कादायक बातमी समोर येत आहे. ते म्हणजे मराठी संस्कृतीतील दिग्गज आणि ज्येष्ठ अभिनेते विजय कदम यांचे आज १० ऑगस्ट रोजी निधन झालेले आहेत. त्यांच्या या निधनाने सगळ्यांना दुःखद धक्का बसलेला आहे. गेल्या दीड वर्षापासून ते कर्करोगाने त्रस्त होते त्यांच्यावर उपचार देखील सुरू होते. परंतु या कर्करोगाशी झुंज देता देता आज त्याची शेवटी हार झालेली आहे आणि या जगाचा निरोप घेतलेला आहे. त्यांच्या निधनानंतर संपूर्ण सिनेसृष्टीतून हळहळ व्यक्त केली जात आहे. मराठी सिनेसृष्टीने एक हिरा गमावलेला आहे. त्यामुळे सगळ्यांनाच खूप वाईट वाटले आहे. आज त्यांच्या पार्थिवावर अंधेरी येथील स्मशानभूमीत अंतिम संस्कार करण्यात येणार आहेत. अभिनेते विजय कदम यांच्या आज सकाळी त्यांच्या अंधेरी येथील घरीच निधन झालेले आहे. ते सध्या ६७ वर्षाचे होते. त्यांच्या मागे त्यांची पत्नी आणि एक मुलगा असा परिवार आहे.



विजय कदम यांनी रंगभूमीसोबत अनेक मराठी चित्रपटात देखील काम केलेले आहे. त्यांनी विच्छा माझी पुरी कर हे लोकनाट्य आणि खूमखुमी हे कार्यक्रम गाजवलेले आहे. त्यानंतर त्यांना खूप जास्त लोकप्रियता मिळाली. त्यानंतर त्यांनी चष्मेबहादूर, पोलीस लाईन, हळद रुसली कुंकू हसलं, आम्ही दोघ राजा राणी यांसारख्या चित्रपटात काम केले. आणि त्यांची एक वेगळी ओळख त्यांनी जगाला पटवून दिली. आज त्यांच्या जाण्याने मराठी सिनेसृष्टीमध्ये एक पोकळी निर्माण झालेली आहे. आणि कलाकार त्यांच्या निधनावर शोक व्यक्त करत आहे. सोशल मीडियावर पोस्ट करून देखील त्यांना श्रद्धांजली अर्पण करत आहेत.

## बालरंगभूमी परिषदेच्या बीड शाखेतर्फे छत्री रंगवा महोत्सवाला उदंड प्रतिसाद

# बालकांच्या जीवनात रंगीबेरंगी चित्र निर्माण होण्यासाठी हा उपक्रम -डॉ.दीपा क्षीरसागर

**बीड (प्रतिनिधी)**
दि.१० : बालकांच्या भावविश्वात रंगी बेरंगी चित्र निर्माण व्हावे, त्यांच्या सुप्त गुणांना वाव मिळावा, रंगाशी खेळता यावे यासाठी छत्री रंगवा महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. यात प्रशिक्षण देवून स्पर्धा घेत बालचित्रकारांचा उत्साह वाढवला. तब्बल १०० बालचित्रकारांनी स्वतः छत्री रंगवली आपल्या कल्पनेतील चित्र त्यांनी रंगवले, असे प्रतिपादन बालरंगभूमी परिषदेच्या राज्य उपाध्यक्ष तथा बीड जिल्हाध्यक्ष प्राचार्य डॉ.दिपाताई क्षीरसागर यांनी केले. बीड शहरातील के.एस.के. महाविद्यालयाच्या प्रांगणात कार्यक्रमाचे उद्घाटन दोन बालकांच्या हस्ते शनिवारी करण्यात आले. यावेळी प्रमुख उपस्थितीत नवगण शिक्षण संस्थेचे सचिव तथा माजी नगराध्यक्ष डॉ.भारतभूषण क्षीरसागर, प्राचार्य डॉ.शिवानंद क्षीरसागर, उपप्राचार्य डॉ.संजय पाटील देवळाणकर, डॉ.सुधाकर गुट्टे डॉ.नारायण काकडे, प्रा. जालिंदर कोळेकर, डॉ.खान अन्सार उल्ला शफिउल्ला, डॉ.दुष्यंता रामटेके, मिलींद शिवणीकर, इंजिनिअर संतोष सानप, मुख्य प्रशिक्षक अमित गाडे, नामदेव साळूंके, डॉ.अनिता शिंदे, सुरेश साळूंके, श्रीकांत पुरी आदींची उपस्थिती होती. पुढे बोलताना डॉ.दिपाताई क्षीरसागर म्हणाल्या की, बालकांच्या जीवनात रंगीबेरंगी रंगाचे भावविश्व निर्माण करण्यासाठी यासारख्या महोत्सवाचे आयोजन करण्यात आले असून आज मोबाईलच्या युगात मुलांच बालपण हिरावून गेले असून त्यांच्या नृत्य, नाट्य, संगीत, खेळणे बागडणे हे हरवले जात आहे. त्यामुळे मुलांच्या गुणांना वाव देण्यासाठी अशा स्पर्धा आयोजित करणे आवश्यक आहे. लहान मुलांचे जग सोनेरी, आनंदी होणे यासाठी छोटया चित्रकारांना पेंटिंगमधून त्यांच्या कला गुणांना, कल्पनेला वाव मिळेल यासाठी या स्पर्धेतून सहभागी बालकलावंताना बक्षीस दिली गेली. परंतु खऱ्या



अर्थाने या स्पर्धेत सहभागी करून घेणे हे त्यांच्यासाठी मोठे बक्षीस मिळाल्यासारखे आहे. शहरातील विविध शाळेतील विद्यार्थी मोठ्या संख्येने सहभागी झाले. त्यातील शाळा गुरूकूल इग्लींश स्कूल, पोतदार इनटरनॅशनल स्कूल, खांडेपारगाव हायस्कूल, चंपावती शाळा, चंपावती इंग्लिश स्कूल, संस्कार विद्यालय, नारायणा स्कूल, शिवाजी विद्यालय, भगवान विद्यालय, भगवान इंग्लिश स्कूल, माऊली प्राथमिक शाळा, पिंगळे विद्यालय, संभाजी विद्यालय, सैनिक स्कूल बीड, बोरफडी हायस्कूल बोरफडी, रामतिर्थ हायस्कूल, हजरत बालेपीर उर्दू स्कूल आदी शाळेतील विद्यार्थी सहभागी झाले. याशिवाय वैयक्तीक बालचित्रकार देखील उपस्थित होते. या महोत्सवात प्रथम- आदित्य शंकर चव्हाण संस्कार विद्यालय बीड, द्वितीय-श्रावणी संतोष गोरे संस्कार विद्यालय बीड, तृतीय-मैथिली मिलींद शिवणीकर नारायण इ.टेक्नो. स्कूल 7 वी, उत्तेजनार्थ - प्रियल प्रविण ढगे पोदार स्कूल, काझी सिध्दीकी हजरथ बालेपीर, आदिती अभिषेक देशमाने पोदार स्कूल, श्रेयस राऊत, समृध्दी श्रीकांत साळूंके गुरूकुल स्कूल, कामरान हसन सैनिकी विद्या, अनघा रविंद्र आदे चंपावती विद्यालय, दिप्ती दिपक राऊत चंपावती विद्यालय यांना नवगण शिक्षण संस्थेचे सचिव तथा माजी नगराध्यक्ष डॉ.भारतभूषण क्षीरसागर यांच्या हस्ते बक्षीसाचे वितरण करण्यात आले. तसेच, रंगवलेल्या छत्र्या व सर्वांना सहभागी प्रमाणपत्र देण्यात आले. या महोत्सवात एकूण शंभर विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला असून त्यांना प्रशिक्षण देण्यासाठी प्रशिक्षक म्हणून समीक्षा राऊत, शर्वरी जोगदंड, तनिषा हिरण, साक्षी सपकाळ, गायत्री जव्हेरी, शिवाणी वरपे, पल्लवी स्वामी, मानस गुळवेलकर, किरण वाघमारे, जानवी गालम, अतुल चौरे, ऐश्वर्या साळूंके, बाळासाहेब कांबळे यांनी विद्यार्थ्यांना कार्यशाळेतून चित्र काढण्यासाठी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. यावेळी बालकलावंत, पालक उपस्थित होते.

## माजलगाव विधानसभा मतदारसंघांमध्ये ज्या उमेदवाराला मतदार संघातले गाव माहित नाही.त्या उमेदवाराला पडू लागले आमदारकीचे स्वप्न,

### स्वत:च्या गावात किती लोकसंख्या माहित नसलेल्या उमेदवाराला पडू लागले आमदारकीचे डोहाळे,

**माजलगाव.प्रतिनिधी**
राजकारणामध्ये अनेकांना वाटतं मी आमदार झालो पाहिजे, मोठया मताधिक्याने निवडूण दिले पाहिजे. परंतू स्वतच्या गावात कीती लोकसंख्या आहे अशा उमेदवाराला पडले स्वप्न. खर पाहिलं तर माजलगाव विधानसभा मतदारसंघ वाटेल तेवढा सोपा नाही. करणं या मतदारसंघ, वडवणी, धारूर या मोठ्या 5बाजारपेठ चया गावाचं समावेश आहे. विवीध जाती धर्माचे लोकं या मतदार संघात आहे. विधानसभा सध्या माजलगाव विधानसभा मतदारसंघांमध्ये अनेक चेहरे आमदारकीच्या रेसमध्ये आहेत, माजलगाव विधानसभा मतदारसंघाच पहिल तर तीन तालुक्याचा विधानसभा मतदारसंघ आहे, यामध्ये प्रस्थापित विरुद्ध विस्थापित असा संघर्ष येणाऱ्या काळामध्ये या विधानसभा च्या रणानगानात पाहायला मिळणार आहे, या विधानसभेच्या रिंगणामध्ये जे उमेदवार आहेत अनेक जणांना मतदार संघातले गाव माहीत नाहीत लोकसंख्या माहीत नाहीत, त्यांचे कार्यकर्ते त्या गावांमध्ये नाहीत, फेसबुक वर पोस्ट सोडायला कार्यकर्ता नाही , अशा उमेदवाराला आमदारकीचे स्वप्न पडू लागले, आमदारकीचा म्हणजे काय पुरणपोळी नाही. गुळणीत पोळी बुडून खण्यावधी सोपी नाही. उमेदवारांनी कोणताच विधानसभेचा अभ्यास न करता लढवणे म्हंजे कॉपी करुन परीक्षेला बेभरोषे पास होणे सारखं आहे.. येणाऱ्या काळात कळेल कोण माजलगाव विधानसभा मतदारसंघावर वर्चस्व करेल,



### केज विधानसभा निवडणुक लढविणार - बहुजन विकास मोर्चाचे अध्यक्ष बाबुराव पोटभरे

अंबाजोगाई (प्रतिनिधी) केज विधानसभा मतदारसंघातून आपण निवडणूक लढविणार आहोत अशी माहिती बहुजन विकास मोर्चाचे अध्यक्ष बाबुराव पोटभरे यांनी अंबाजोगाईत शनिवारी आयोजित पत्रकार परिषदेतून दिली. यावेळी त्यांनी अनेक महत्त्वाच्या विषयावर आपले मत व्यक्त केले. तसेच ज्वलंत विषयावर लक्ष ही वेधले. मागील काही दिवसांपासून अनुसुचित जातीसाठी राखीव केज विधानसभा मतदारसंघातून बहुजन विकास मोर्चाचे अध्यक्ष बाबुरावजी पोटभरे हे आगामी २०२४ ची निवडणूक लढविणार असल्याची चर्चा ऐकावयास मिळत होती. त्या पार्श्वभूमीवर पोटभरे यांनी केज मतदारसंघातील अनेक गावांना भेटी दिल्या आहेत. तसेच प्रमुख नेत्यांच्या, सर्वसामान्य जनतेच्या आणि विविध समाज घटकांच्या गाठी - भेटी घेऊन त्यांच्या सोबत चर्चा सुरू केली आहे. संवाद साधला आहे. हे त्यांच्या अंबाजोगाई येथे शनिवार, दि. १० ऑगस्ट रोजी आयोजित केलेल्या पत्रकार परिषदेतून दिसून आले.

## साहेब, तुम्ही मला फक्त लढ म्हणा-प्रा.ईश्वर मुंडे

### माजलगाव विधानसभेसाठी खा.शरदचंद्र पवार यांच्याकडे तिकीटाची मागणी

**।प्रतिनिधी**
विधानसभा निवडणूक जशी जशी जवळ येत आहे तशी तशी सर्व पक्ष आणी संभाव्य उमेदवार कामाला लागलेले आहेत. खा.शरदचंद्र पवार यांच्या नेतृत्वावर विश्वास ठेवून बीड जिल्हा परिषद अंतर्गत नौकरीचा स्वेच्छा राजीनामा देवून पक्षात सक्रीय कार्यरत असलेले व बीड लोकसभेसाठी जनतेच्या पसंतीला उतरलेले प्रा.ईश्वर आनंदराव मुंडे यांनी खा.शरदचंद्र पवार यांच्या पुणे येथील मोदीबाग निवासस्थानी भेट घेऊन आपले पक्ष व सामाजिक कार्य सांगून माजलगाव विधानसभा निवडणूकीसाठी मला तिकीट देवून साहेब, तुम्ही मला फक्त लढ म्हणा.. माजलगाव विधानसभा पक्षाचे सर्व कार्यकर्ते व सुजान मतदार यांच्या आशिर्वादाने आपणास जिंकून देवू असा आत्मविश्वास खा.शरदचंद्र पवार यांना प्रा.ईश्वर मुंडे यांनी दिला आहे.



## बीड उबाटा बीडमध्ये खिंडार महिला आयोगाच्या सदस्य संगीता चव्हाण आणि दोन युवा सेनेचे जिल्हा प्रमुख शिंदे सेनेत प्रवेश

### सुषमा अंधारे यांच्यावर गंभीर आरोप करत उद्धव ठाकरेला केला राम राम

**बीड।प्रतिनिधी**
उद्धव ठाकरे च्या शिवसेनेला बीडमध्ये खिंडार पडली असून महिला आयोगाच्या सदस्य असलेल्या संगीता चव्हाण आणि युवा सेनेचे जिल्हाप्रमुख यांनी उद्धव ठाकरे ची साथ सोडली असून त्यांनी आता एकनाथ शिंदे च्या शिवसेनेमध्ये प्रवेश केला आहे पक्ष सोडताना संगीता चव्हाण यांनी शिवसेना नेत्या सुषमा अंधारे यांच्यावर गंभीर स्वरूपाच्या आरोप केले आहेत त्यामध्ये पदासाठी सुषमा अंधारे पैसे घेतात आणि त्यांनी शिवसेना पक्ष संपवण्यासाठी कोणाची तरी सुपारी घेतल्याचा आरोप देखील त्यांनी केलाय यापुढे शिंदे च्या शिवसेनेच्या कुठल्याही नेत्यावर जर आरोप केला तर चूक दिला जाईल असा कणखणी इशारा देखील संगीता चव्हाण यांनी सुषमा अंधारे यांना पक्ष सोडताना दिला आहे त्यामुळे येत्या काळात सुषमा अंधारे यांना रोखण्यासाठी संगीता चव्हाण या पुढे येणार असल्याचे संकेत त्यांनी दिले आहेत.



## जोमेगाव येथील मारोती पांचाळ यांचा उत्कृष्ट पोलीस पाटील म्हणून जिल्हाधिका-यांच्या हस्ते सन्मान

### कंधार लोहा विभागातून उत्कृष्ट पोलीस पाटील म्हणून जोमेगाव येथील पोलीस पाटील मारोती धोंडीबा पांचाळ यांना सन्मानित करताना नांदेड जिल्ह्याचे जिल्हाधिकारी अभिजित राऊत

**नांदेड प्रतिनिधी : बालाजी सिरसाट**
नांदेड : महसूल दिनाच्या दिवशी कंधार उपविभागातून लोहा तालुक्यातील जोमेगाव येथील पोलीस पाटील मारोती धोडिंबा पांचाळ यांना उत्कृष्ट पोलीस पाटील म्हणून जिल्हाधिकारी अभिजीत राऊत यांच्या हस्ते शाल, श्रीफळ व सन्मानपत्र देऊन नुकताच गौरव करण्यात आला. मारोती पांचाळ यांची जोमेगाव चे पोलीस पाटील म्हणून १०-नोव्हेंबर १९९८ नेमणूक झाली.त्यांनी गेल्या २५ वर्षापासून गावात कायदा व सुव्यवस्था अबादित रहावी म्हणून प्रयत्न केले.गावातील भांडण-तंटे गावातच मिटवण्याचा प्रयत्न केला.सामाजीक, शैक्षणीक, धार्मिक कार्यात सतत सहभागी असतात.सार्वजनिक सण, उत्सव विना पोलिस बंदो बस्ता शिवाय करण्याचा प्रयत्न.जाती, धर्माचा, पंथाचा, वंशाचा विचार न करता" सर्व धर्म समभाव" जोपासण्याचा प्रयत्न.महामानव छत्रपती शिवाजी महाराज, डॉ बाबासाहेब अंबेडकर, साहित्यरत्न आण्णा भाऊ साठे अहिल्याबाई होळकर, यांच्या जयंती सर्व समाज एकत्र येऊन साजऱ्या करण्याचा प्रयत्न ते नेहमी आपल्या कृतीतून दाखवत असतात. त्यांनी महसूल विभाग व पोलिस विभागाबद्दल उत्कृष्ट सेवा केल्याने त्यांना उत्कृष्ट पोलीस पाटील म्हणून गौरव करण्यात आले. यावेळी नांदेड परिक्षेत्राचे पोलीस उपमहानिरीक्षक शहाजी उमाप, निवासी उप जिल्हाधिकारी महेश वडदकर, कंधार उपविभागीय अधिकारी अरूणा संगेवार, मंडळअधिकारी चंद्रशेखर सहारे, परिसरातील पोलिस पाटील बालाजी जाधव, भैरवनाथ भरकडे आदीची उपस्थिती होती. या सन्मान बद्दल जोमेगाव येथे जिल्हा कॉंग्रेस कमिटीचे उपाध्यक्ष भास्कर पाटील जोमेगावकर व प्रतिष्ठीत गावकऱ्यांनी पांचाळ यांचे अभिनंदन करत त्यांचा पुष्पहार घालून सत्कार केला.



## पुणे आयकर अतिरिक्त आयुक्त पदी विश्वास मुंडे IRS

**परळी (प्रतिनिधी)**
परळीचे भूमिपुत्र तथा छत्रपती संभाजी नगर आयकर विभागाचे अतिरिक्त आयुक्त विश्वास सोपानराव मुंडे IRS यांच्यावर आता पुण्याची नवी जबाबदारी सोपवण्यात आली आहे .पुणे आयकर विभागाच्या अतिरिक्त आयुक्त पदावर त्यांची नियुक्ती करण्यात आली आहे. विश्वास मुंडे IRS परळी तालुक्यातील कनेरवाडी चे भूमिपुत्र आहेत. संपूर्ण महाराष्ट्रभर ओळख आहे आयकर विभागात चोखपणे काम करून त्यांनी आपल्या याच कामातून कर्तव्यपणा सिद्ध करून दाखवला आहे. मागच्या काही महिन्यापूर्वी त्यांची छत्रपती संभाजीनगर आयकर विभागाच्या अतिरिक्त आयुक्त पदावर नियुक्ती करण्यात आली होती .याही ठिकाणी त्यांनी अगदी चोखपणे कर्तव्य निभावले होते. आता त्यांच्यावर पुण्याची नवी जबाबदारी सोपवण्यात आली आहे पुणे आयकर विभागाच्या अतिरिक्त आयुक्त पदावर ते आता काम पाहणार आहेत त्यामुळे याही ठिकाणी अगदी चोखपणे ते कर्तव्य निभावतील असा विश्वास प्रत्येकाला आहे .त्यांची पुणे अतिरिक्त आयकर आयुक्त पदावर नियुक्ती झाल्याबद्दल त्यांचे सर्व स्तरातून अभिनंदन होत आहे.



## विद्यार्थ्यांनी संभाषण कौशल्यावर प्रभुत्व मिळवावे डॉ. विश्वास कंधारे

**माजलगाव प्रतिनिधी**
विद्यार्थ्यांनी संभाषण कौशल्यावर प्रभुत्व मिळवावे असे प्रतिपादन कालिकादेवी महाविद्यालय शिरूर कासार चे प्राचार्य डॉ. विश्वास कंधारे यांनी केले. श्री सिद्धेश्वर महाविद्यालय माजलगाव हिंदी विभाग यांच्या वतीने संभाषण कौशल्य या विषयावर आयोजित व्हॅल्यू एडेड प्रमाणपत्र कोर्सच्या उद्घाटन प्रसंगी ते बोलत होते. अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सुहास मोराळे तसेच मंचावर हिंदी विभाग प्रमुख डॉ. युवराज मुळये व डॉ. गंगाधर उषमवार उपस्थित होते.

पुढे बोलताना डॉ. विश्वास कंधारे म्हणाले की, सध्याच्या युगामध्ये कौशल्याशिवाय तरुणोपाय नाही. विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा जर विकास करावयाचा असेल तर आपल्याकडे वेगवेगळे स्किल/ कौशल्य असणे ही काळाची गरज आहे. आपल्याकडे कौशल्य असेल तर आपण कोणत्याही क्षेत्रामध्ये पारंगत होऊ शकतो व आपल्या कौशल्याच्या बळावरच आपण रोजगार देखील मिळवू शकतो. भविष्यात नवीन शैक्षणिक धोरणामध्ये कौशल्याधिष्टीत शिक्षणालाच सरकारने महत्त्व दिले आहे. म्हणून विद्यार्थी जीवनातच तुम्ही वेगवेगळी कौशल्य आत्मसात करा व हिंदी भाषेने जो संभाषण कौशल्य हा पाठ्यक्रम चालू केला आहे त्यामध्ये सहभाग नोंदवून आपला व्यक्तिमत्व विकास करा असे आवाहन याप्रसंगी केले.

कार्यक्रमाचा अध्यक्षीय समारोप करताना महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सुहास मोराळे म्हणाले की, हिंदी विभागाने हा जो स्तुत्य उपक्रम चालू केला आहे तो अभिनंदनीय आहे. विद्यार्थ्यांनी अशा प्रमाणपत्र पाठ्यक्रमामध्ये सहभागी होऊन आपल्या व्यक्तिमत्त्वास योग्य अशी दिशा या वयातच दिली पाहिजे. तुमच्याकडे जर विविध स्किल/ कौशल्य असतील तर तुम्ही वेगवेगळ्या क्षेत्रात आपले नाव चमकवू शकता. आपणास ज्याची आवड असते अशी वेगवेगळी स्किल महाविद्यालयीन जीवनामध्ये आपण शिकून त्यामध्ये पारंगत होणे गरजेचे आहे.



या कार्यक्रमाचे प्रास्ताविक चि. क्षितिज साळवे यांनी केले. सूत्रसंचालन कु. श्रुती गिलबले हिने केले तर आभार कु. रोहिणी सुरवसे हिने मानले. या प्रमाणपत्र कोर्सच्या उद्घाटन प्रसंगी डॉ. प्रेमनंद घडसिंग, डॉ.जिजाराम बागल तसेच हिंदी विभागातील बहुसंख्य विद्यार्थी-विद्यार्थिनी उपस्थित होते.

# माझ्या वाटेला जाऊ नका,अन्यथा निवडणुकीत एकही सभा घेऊ देणार नाही;राज ठाकरेंचा इशारा

'माझ्या नादाला लागू नका, अन्यथा विधानसभा निवडणुकीत एकही सभा घेऊ देणार नाही, असा इशारा मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांनी शिवसेना ठाकरे गट आणि शरद पवार गटाला दिला. आगामी निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर राज ठाकरे मराठवाड्याच्या दौऱ्यावर आहेत. या दौऱ्यादरम्यान, त्यांनी जालन्यात मनसे पदाधिकाऱ्यांच्या भेटीगाठी घेतल्या. यानंतर जाहीर पत्रकार परिषदेत राज ठाकरेंनी थेट इशारा दिला. राज ठाकरे म्हणाले,'लोकसभेत पंतप्रधान मोदी आणि अमित शहा यांच्या विरोधा मतदान झालं. ते तुम्हाळा मिळालं होतं. त्यांच्या प्रेम असल्यामुळे मतदान झालेलं नाही. मनोज जरांगे पाटील यांच्या आडून विधानसभेचं राजकारण सुरु आहे. ही बाब समोर यायला पाहिजे. शरद पवार यांच्या सारखे अनुभवी व्यक्ती महाराष्ट्रात मणिपूर होईल,असं वक्तव्य केले जात आहे. 'शरद पवार आणि उद्धव ठाकरेंना मराठवाड्यात पुढील तीन महिन्यात दंगली घडवायच्या आहेत. शरद पवारांचं राजकारण पाहिल्यास समजून येईल. दुसऱ्या जातीविषयी द्वेष निर्माण करणं, हे पवारांनी राष्ट्रवादी निर्माण केल्यानंतर सुरु झालं, असा आरोप ठाकरेंनी केला. 'माझ्या नादी कोणी लागू नये. समजात द्वेष निर्माण करून कशाप्रकारचे राजकारण करत



तुमच्याकडे प्रस्थापित आहेत. तर माझ्याकडे विस्थापित आहेत. आहेत. देवेंद्र फडणवीसांचा विरोध असेल तर त्याविषयी बोला. पण समाजात कशाला तेढ निर्माण करता, असे राज ठाकरे म्हणाले. आरक्षण का दिलं नाही? मराठा समाजाचा आरक्षणासाठी मुंबईत पहिला मोर्चा निघाला. त्यावेळी भाजप, राष्ट्रवादी काँग्रेस, काँग्रेस आणि शिवसेनेचे नेते होते. सर्वांनी एकमुखांनी सांगितलं की, मिळायला हवं. जर सर्वांनी एकमुखांनी सांगितलं तर तुम्हाला आडवलं कुणी? सर्वांचं एकमत असताना अडवलं कुणी? मागील १५ वर्षांपासून मराठा समाजाला आरक्षण का दिलं नाही? असा सवाल राज ठाकरेंनी उपस्थित केला.

## उत्तर भारतीय कळवा मुंब्रा विधानसभेचे हे दोन चमकणारे तारे खालिद खान अध्यक्ष आणि दानिश खान उपाध्यक्ष झाले.

मुंब्राचे आमदार जितेंद्र आव्हाड यांच्या वाढदिवसानिमित्त काँग्रेस राष्ट्रवादी पक्षाचे (शरद पवार गट) नेते शमीम खान यांच्या कार्यालयात दोन तरुणांचा पक्षात समावेश करण्यात आला. खालिद खान यांना राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या (शरदचंद्र पवार गट) कळवा मुंब्रा विधानसभेचे अध्यक्ष करण्यात आले, तर दानिश खान यांना उत्तर भारतीयांच्या कळवा मुंब्रा विधानसभेचे उपाध्यक्ष बनवण्यात आले स्पष्ट आहे की, हे लोक अनेक वर्षांपासून समाजसेवा करत आहेत, त्यामुळेच आज या लोकांचे नाव उंचावले आहे.आमदार जितेंद्र आव्हाड आणि नेते शमीम खान, माजी नगरसेवक अशरफ उर्फ शानू पठान यांनी खलिद खान आणि दानिश खान यांचा समावेश करून त्यांची समाजसेवा आणि लोकांचे प्रेम पाहून त्यांचा गौरव केला राजकारणात गरज आहे, समाजाला समजून घेणारे आणि भेदभाव न करता प्रत्येक घटकाला सोबत घेऊन जाणारे लोक आज खालीद खान आणि दानिश खान यांचे अभिनंदन करण्यासाठी बाहेर पडले आणि महाराष्ट्राचे राजकारण अधिकच तापले शरद पवार जी, त्यांच्या कन्या सुप्रिया ताई, श्री. अनिल देशमुख, श्री. जितेंद्र आव्हाड जी, श्री. शमीम खान जी हे खालिद खान यांच्यासारखे पक्षाचे हात बळकट करण्यासाठी रात्रंदिवस झटत असल्याचे सूत्रांकडून समोर आले आहे. आगामी विधानसभा निवडणुकीत दानिश खान अधिकाधिक लोकांना आपल्यासोबत सामावून घेत पक्षाच्या बॅनरखाली काम करतील, असे दानिश खान यांनी आपल्या कार्यालयातून सांगितले मतदार ओळखपत्रात नाव आणि मतदान हा आमचा हक्क आहे.जेव्हाही तुम्ही मतदार ओळखपत्र बनवा, तेव्हा तुम्ही तुमच्या भागात जाऊन जनतेला आमदार जितेंद्र आव्हाड यांनी केलेल्या कामाची माहिती देत आहात.

## राष्ट्रवादी काँग्रेस युवती प्रदेशाध्यक्षपदी निवडीचे पत्र संध्या सोनवणेंना देताना उपमुख्यमंत्री अजित पवार.

### जामखेडला प्रथमच प्रदेशाध्यक्षपद राष्ट्रवादी काँग्रेसच्या युवती प्रदेशाध्यक्षपदी संध्या सोनवणे

बीड प्रतिनिध

:- राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाच्या युवती प्रदेशाध्यक्षपदी जामखेडच्या संध्या सोनवणे यांची निवड झाली आहे. यानिमित्ताने जामखेडला प्रथमच प्रदेशाध्यक्षपदाची संधी मिळाली आहे. राष्ट्रवादीचे प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे यांनी या निवडीचे पत्र संध्या सोनवणे यांना दिले असून, हे पत्र उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या हस्ते त्यांना मुंबई येथे देण्यात आले. संध्या सोनवणे जामखेड तालुक्यातील नायगावच्या आहेत. ग्रामपंचायत सदस्य ते महाराष्ट्र राष्ट्रवादी काँग्रेस युवती प्रदेशाध्यक्षा असा त्यांचा प्रवास थक्क करणारा आहे. सोनवणे यांनी ग्रामीण भागातील महिला व मुलींच्या आरोग्यासाठी जनजागृती करत विविध उपक्रम राबवले आहेत. विविध उत्सव, तसेच महापुरुषांच्या सार्वजनिक जयंती उत्सव, शाळा, कॉलेजमधील मुलींसाठी विविध आरोग्यविषयक उपक्रम सातत्याने राबवले आहेत. याच कामांची दखल घेऊन, उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी सोनवणे यांची युवती प्रदेशाध्यक्षपदी नियुक्ती केली आहे.


सदस्य ते प्रदेशाध्यक्षपद

संध्या सोनवणेंचे प्राथमिक शिक्षण शहरातील लोकमान्य शाळेत, तर माध्यमिक शिक्षण प्रवरा लोणी येथे झाले. सोनवणे यांनी पुण्यातील फर्ग्युसन कॉलेजमधून बीए पदवी मिळवली असून, मॉर्डन कॉलेजमधून लॉ ची पदवी मिळवली आहे. फग्र्युसन कॉलेज निवडणुकीमध्ये महासचिव म्हणून त्यांची निवड झाली होती. सन २०१९ मध्ये त्यांनी राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये प्रवेश केल्यानंतर त्यांच्यावर युवती आघाडीच्या जिल्हाध्यक्षपदाची जबाबदारी देण्यात आली होती.

## अभिमान इंगोले शिवछत्रपती गुणगौरव पुरस्काराने सन्मानित....

हिंगोली प्रतिनिधी

हिंगोली जिल्ह्यातील पुसेगाव येथील रहिवासी असलेले दै. गाववाला कवि शायर मंच चे सदस्य कवि राहुल इंगोले यांचे सुपुत्र अभिमान इंगोले याला नुकताच शिवछत्रपती गुणगौरव पुरस्कार देऊन सन्मान करण्यात आला.पुसेगाव येथील शिवछत्रपती युवा प्रतिष्ठान तर्फे देण्यात येणारा शिवछत्रपती गुणगौरव पुरस्कार दिनांक आठ ऑगस्ट रोजी पुसेगाव येथील विशेष कार्यक्रमात चि. अभिमान यास जिल्ह्याचे जिल्हाधिकारी आदरणीय जितेंद्र पाफळकर यांच्या शुभहस्ते प्रदान करण्यात करण्यात आला. यावेळी कार्यक्रमाचे



अध्यक्ष जिल्ह्याचे शिक्षणाधिकारी संदीपकुमार सोनटक्के साहेब हे होते, तर प्रमुख पाहुणे म्हणून पोलीस अधीक्षक आदरणीय जी श्रीकांत आणि अप्पर पोलीस अधीक्षक अर्चना पाटील मॅडम ह्या होत्या. शिवछत्रपती युवा प्रतिष्ठानचे संस्थापक सीताराम जवळे यांनी गुणवंतांच्या विद्वत्तेचा सन्मान व्हावा या उद्देशाने संबंधित पुरस्काराची घोषणा केली, त्यामध्ये अभिमान इंगोले याला शाळेत विशेष प्रविण्य मिळाल्याबद्दल तसेच सर्वात लहान कवि म्हणून शिवछत्रपती गुणगौरव पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले. सध्या अभिमान हा छत्रपती संभाजीनगर येथे सुशीलादेवी देशमुख शाळेत इयत्ता सहावीत शिकत आहे. शाळेतील अभ्यासाबरोबरच अभिमानला काव्य लिखाणाची आवड आहे. त्याने आतापर्यंत दहा ते बारा कविता लिहल्या आहेत. काही दिवसापूर्वी अहमदनगर येथे झालेल्या कवि सम्मेलनात अभिमानला गौरवण्यात आले होते. अभिमानच्या वर्गशिक्षिका आदरणीय भालकीकर मॅडम यांनी तसेच शाळेतील समस्त शिक्षकांनी अभिमानला प्रोत्साहन दिल्याचे त्याने सांगितले. या यशाबद्दल अभिमानचे प्रा. प्रकाश ठोके सर,प्रा. सुशील सातपुते सर, कवि विजय पांचाळ, सुनीता कपाळे, दै. साहित्यतेजच्या संपादिका सुप्रिया जाधव यांनी अभिनंदन केले. या यशाबद्दल अभिमानचे सर्व स्तरातून अभिनंदन होत आहे.



बीडः मनसे प्रमुख राज ठाकरे बीडमध्ये आले असता त्यांचे स्वागत करताना सायं दें. बीड प्रसारचे मुख्य संपादक समीर काझी तथा लोकमंथन चे निवासी संपादक देवेंद्र सिंह ढाका...!

# काही चांगले करण्यासाठी-बनवण्यासाठी आणि घेण्यासाठी संताची निर्मिती असते : अमृत ऋषी मा.सा

**बीड (प्रतिनिधी)** : स्वतः समोर ज्याने एखादे ध्येय ठेवले आहे. असा माणूस जर चुका करीत असेल, तर काहीच ध्येय नसलेला माणूस असंख्य चुका करील. याबद्दल खात्री वाटते म्हणून स्वतः समोर कोणते ना! कोणते ध्येय ठेवणे चांगले आहे. याच तत्वज्ञानावर आज आनंद गणेश दरबारात संत मंडळी मध्ये विचार मंथन होते. सर्वप्रथम प.पू. आचलऋशषी मा.सा .ने सांगितले आपण जन्माला आलो की, जगाच्या संपर्कात राहूनच आणि कळत नकळत त्याचा आपल्यावर परिणाम होत असतो, जसा शेअर मार्केटच्या व्यवहारात भागधारकाचा येतो याप्रमाणे आपला जगाशी संबंध निगडित होतो. त्या भागधारकाला मिळतो तसा भौगोलिक, राजकीय, उलाढालीचा मानवावर परिणाम होतो म्हणून अशा व्यवहारापासून विरक्त होण्यासाठी त्या कंपनीचा संबंध तोडला जातो. तसेच अनियमित सवयीतून जडलेले दुर्गुण टाळण्यासाठी काही प्रत्याखाण प्रतीज्ञा केली तर ध्येयपूर्ती होणे सोईचे जाते. तर घेतलेल्या नियमाने त्या सवयीच्या आसक्ती पासून दूर राहता येते. व कर्मनिर्जराला साथ मिळते. काही रीतीरीवाज या संस्काराने बाधित असतात जसा जैन समाज मांसाहारापासून दूर असतो वाईट व्यसनापासून दूर राहण्यासाठी त्यांनी एका मद्यपीचे उदाहरण दिले. हा मद्यपी संताकडून दारू सोडण्याची प्रतिज्ञा करण्यासाठी धर्म दरबारात येतो. मात्र त्यावेळी त्याला धडा शिकवण्यासाठी संत एका झाडाच्या बुंध्याला धरून उभे असतात हा खाकरून संतांचे ध्यान विचलित करतो व मी आपण सांगितल्याप्रमाणे उपस्थित आहे असे सुचवतो. त्यावर संत मला झाड सोडत नव्हता हे सांगतात यावरून झाड धरून ठेवत नसते तर आपणच त्याला पकडलेले असते मात्र त्याला कळावे म्हणून आपणास झाडाने धरून ठेवली होते हे सांगितल्याने त्याचे कार्य सफल होते हे सांगितले जाते. तर अमृत ऋषी मा.सा.ने क्षेत्र आणि तीर्थाचे महत्त्व सांगताना सांगितले ज्या ठिकाणाहून संकल्पना आणि कल्पना चा परमार्थासाठी प्रारंभ होतो त्याला तीर्थ संबोधले जाते. अशा तीर्थाच्या ठिकाणीच परमार्थातून जीवन जगले जाणे महत्त्वाचे वाटते. कारण ते क्षेत्र पावन असते या ठिकाणी तीन गतीची जीव आपल्या आस्थेने जीवनात आनंद घेण्यासाठी जगतात परमार्थाची संकल्पना काही चांगले करण्यासाठी काही चांगले घेण्यासाठी व काही चांगले बनवण्यासाठी या ठिकाणीप्रारंभ करतात आणि जीवनात चांगले घडण्यासाठी जीवनाचा अर्थ समजून तर्क,वितर्क वादविवादाला टाळून सुसंवाद घडवतात. अशा ठिकाणी मनात भय उरत नसते व सर्व प्राणी एकत्रितपणे एकोप्याने तेथे थांबतात. संवाद हाच विषारी असतो तो परमार्थाकडे आकर्षित करीत नाही. अशाच वादविवादातून घर परिवार समाजातही वीतुष्ट वाढते. मात्र सुसंवाद घडवण्याला धर्म दरबारात कोणी हजर नसते. असते ते केवळ हावशे गवशे आणि नवसे आवश्यक असतात भजनाला केवळ साठ आणि जेवणाला भरमसाठ अशी त्यांची संख्या असते आज-काल भक्ताची




संख्याही आराधनेला कमी असते त्यातल्यात्यात उद्दिष्टा पोटी केलेल्या भावनेला नवसाला उत्स्फूर्त गर्दी त्यापासून मिळणाऱ्या चमत्काराला जास्त दिसून येते नमस्कार हीच लोकांची भावना असे चमत्कार मिथ्यात्वाचे लक्षण धर्म दरबारात देवाची उपस्थिती असते हेच आपले परमात्मा आहेत. आपला आत्मा हाच आपल्या सुखदुःखाच्या सोबती आहे. ज्याला गुरुचा आशीर्वाद मिळतो तोच खरा गुरुच्या हृदय स्थानी विराजित होतो. तर खानदेश केसरी उपप्रवर्तक अक्षय ऋषी महाराज साब यांनी आपल्या प्रवचनातून जैना विषयी सांगितले एक व्यक्ती जैन बनला तर त्याची पूर्ण पिढी अहिंसात्मक बनते अभयदान देणारी ठरते. जैन धर्म हा अहिंसेवर आधारीत आहे त्यांनी पुढे जे अपूर्ण राहिले होते ते वाणीवर विवेचन चालू केले यापूर्वी त्यांनी कार्यकरीतम् अर्थात आवश्यकतेपेक्षा वाणीतून जास्त बोलू नये व गर्वरहीतम् या वाणीच्या प्रकारावर भाष्य करताना गर्वरहीत वाणीचे उदाहरण दिले त्यात राजा भरत हा ज्येष्ठ असतो मात्र संन्यस्त झालेल्या लहान भावाचे वंदन करावे लागेल म्हणून अहंकाराने धार्मिकतेतुन पिछाडला जातो त्याला ऋषभ देवाच्या सांगण्यावरून बहिणीने अहंकाराविषयी पछाडल्यावर तो योग्य मार्गाला येऊन मोठा ज्ञानी होऊन नावलौकिकाला पोहोचतो तर वाणीच्या अतूछम वाणीवर याचा अवकाश प्रवचन देऊ असे त्यांनी सांगितले.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक अजय महादेव भांगे यांनी निर्मिती प्रिंटिंग प्रेस, टाकळी रोड , धोंडीपुरा , जोशी नर्सिंग होमच्या समोर बीड ता.जि. बीड ४३११२२ येथे छापून दैनिक वादळवार्ता कार्यालय, महात्मा फुले नगर केज, पाण्याच्या टाकीजवळ केज ता. केज जि. बीड ४३११२३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.मो.न.९४२२६६००७७

This newspaper is printed by owner, printer,publisher,editor Ajay Mahadev Bhange at nirmiti printing press, takli road, dhondipura in front Joshi nursing Home,Beed,tq.Beed,Dist.Beed 431122, Maharashtra and published at Dainik Vadalvarta office Mahatma Phule Nagar, near water tank kaij tq.kaij dist.Beed 431123(Maharashtra) mo.no.9422660077